# ऋ ण नि र्दे श

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांचे कार्य ( विशेष अभ्यास पंचायत समिती शिराळा, जि. सांगली. सन १९७७-८९ ) या माझ्या शोधप्रबंधाच्या मार्गदर्शिका डॉ. श्रीमती. व्ही. पी. रासम, यांचे नेहमीच मला मार्गदर्शन लाभलेले आहे. त्यांचे बहुमोल सहकार्य व अनमोल मदत याबद्दल मी त्यांचा शतश: ऋणी आहे. त्याचप्रमाणे शिवाजी विद्यापीठ, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. के. के. कावळेकर, सौ. पाटील, डॉ. ए. एस. चौसाळकर आणि श्री. तोरस्कर यांचेही मला या कामी बहुमोल सहकार्य लाभलेले आहे.

शिराळा पंचायत समितीने केलेल्या कार्याचा अभ्यास करीत असताना मा. शिवाजीराव नाईक ( अध्यक्ष जि. प. सांगली ), जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी व प्रशासन विभागातील अधिकारी, शिराळा पंचायत समितीचे सभापती श्री. रामचंद्र पाटील, उपसभापती मस्केबापू, गटविकास अधिकारी मा. जे. के. पाटील, सभापतीचे स्विय सहाय्यक तानाजीराव जाधव (दाजी) व त्यांच्या सर्व सहका-यांचे मोलाचे सहकार्य लाभले, त्याबद्दल प्रथम त्यांचे आभार मानने अगत्याचे आहे.

श्री. शिव-शाहु महाविद्यालय सरूडचे स्फूर्तीस्थान व संस्थेचे अध्यक्ष मा. आमदार बाबासाहेब पाटील, सरचिटणीस गणपतराव थोरात कॉलेजचे प्रभारी प्राचार्य तांबोळी सर यांची प्रेरणा व सहाय्य अनमोल आहे. माझे सहकारी मित्र प्रा. बी. के. पाटील, प्रा. साळुंखे, प्रा. दिलीप पाटील, प्रा. नाळे, प्रा. सौ. देशमुख, प्रा. देसाई, प्रा. सौ. पाटील, प्रा. मोनाळकर, प्रा. प्रताप पाटील, प्रा. जी. बी. पाटील, प्रा. जमादार, प्रा. कु. अडिसरे, प्रा. कांबळे, प्रा. मोरे, प्रा. जाधव, प्रा. मारूती पाटील, प्रा. एम. के. पाटील,

प्रा. शिवाजी पाटील, प्रा. गाडवे, प्रा. गणपती कांबळे, व सर्व ज्युनिअर प्राध्यापक, ग्रंथपाल सौ. थिटे, तानाजी पाटील व सहाय्यक यांनी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष मदत केलेली आहे. त्याचप्रमाणे संबंधित लघुप्रबंध टायपिंग करुन सौ. तोरस्कर यांनी मोलाचे सहकार्य केलेले आहे.

औंढी गावातील तुकाराम, आनंदराव, नामदेव पाटील, सरपंच बाबुराव जाधव (आप्पा), पोलीस पाटील बाबासो जाधव, आनंदराव शिंदे, विश्वास पाटील, विलास दाजी, शामराव तात्या, जालींदरदादा, गणपती पाटील, शिराळा कॉलेजचे प्रा. जोशीसर, प्रा. गायकवाड सर, कर्मवीर कॉलेज इस्लामपुरचे प्रा. बी. बी. पाटील, प्रा. एस. एस. जाधव, आकाराम चव्हाण (मामा), पी. एच. पाटील, (तलाठी), सांगलीचे प्रकाश गिरी, शंकरराव पाटील, सरुडचे सरपंच राजाराम डाकवे, उपसरपंच सर्जेराव पाटील, सर्जेराव डाकवे (आबा), नामदेवराव नांगरे यांची या कामी बहुमोल साथ मिळाली.

माझेवर प्रेमाचा वर्षाव करणारे माझे आराध्य दैवत आई व वडील (कै. आबू) यांचा लाभलेला आशिर्वाद, ज्यांनी मला जीवनाचा हा मार्ग दाखविला ते, माझे वडीलबंधू मारुतीदादा, तात्या, दिनकर आणि माझी धर्म पत्नी सौ. सुनंदा जाधव या सर्वांच्या सहकार्याने, मार्गदर्शनाने व प्रेरणेने मी हा प्रबंध पूर्ण करु शकलो . या सर्वांचे आभार मानून ऋणनिर्देश व्यक्त करणे माझे कर्तव्य आहे.

## -:- तक्त्यांची यादी -:-

| अ.नं. | तक्ता क्रमांक | तक्त्याचे नांव (सन १९७७ ते १९८९ अखेर) | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | २:१ | शिराळा पंचायत समितीची स्थापना व रचना. | ३० |
| २. | २:२ | सभापती व उपसभापती निवडणूक | ३४ |
| ३. | २:३ | सन १९७७ ते १९८९ अखेर शिराळा पंचायत समितीचे अंदाजपत्रक | ३७ |
| ४. | २:४ | पंचायत समितीकडे जमा रक्कम १९७७-८९ | ४० |
| ५. | २:५ | सन १९७७ ते १९८९ प्रत्यक्ष केलेल्या खर्चाचा गोषवारा. | ४१ |
| ६. | २:६ | शिराळा पंचायत समितीच्या कार्यक्षेत्रातील ग्रामपंचायतीची रचना दाखविणारे पत्रक. | ४४ |
| ७. | ३:अ-१ | जि.प. कडून चालविल्या जाणाऱ्या प्राथमिक शाळा आणि त्यामधील नाव नोंदणी. | ५२ |
| ८. | ३:अ-२ | जि.प. कडे काम करणाऱ्या प्राथमिक शाळेतील शिक्षक संख्या | ५५ |
| ९. | ३:अ-३ | माध्यमिक शिक्षण | ५७ |
| १०. | ३:अ-४ | जि.प. ने चालविलेल्या प्राथमिक शाळांच्या जागांची स्थिती | ६० |
| ११. | ३:ब-१ | जमिनीच्या वापरासंबंधी आकडेवारी | ६५ |
| १२. | ३:ब-२ | खाते व रासायनिक खाते यांचा वापर | ६८ |

| अ. नं. | तक्ता क्रमांक | तक्त्याचे नांव (सन १९७७ ते १९८९ अखेर) | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १३. | ३:ब-३ | गोबर गॅस प्लँट योजना | ७१ |
| १४. | ३:क-१ | प्राथमिक आरोग्य केंद्रे, पथके, प्रसुती व शिशु आरोग्य केंद्रे यावर झालेला खर्च दर्शविणारा तक्ता. | ७४ |
| १५. | ३:क-२ | शालेय आरोग्य तपासणी अहवाल | ७७ |
| १६. | ३:ड-१ | पात्र अनुदानीत मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह. | ८२ |
| १७. | ३:इ-१ | वर्षभरात झालेले काम आणि त्यावर झालेला खर्च. | ८७ |
| १८. | ३:फ-१ | औषधोपचार व खच्चीकरण केलेल्या कामाचा अहवाल. | ९३ |

# प्रस्तावना

स्थानिक स्वराज्य संस्था या लोकशाही शासन पध्दतीत तळागाळापर्यंतच्या लोकांपर्यंत पोहचणेचे एकमेव साधन आहे. या स्थानिक स्वराज्य संस्था देशाचे नेतृत्व निर्माण करण्याच्या आणि लोकशाही यशस्वी करण्याच्या प्रयोगशाळा आहेत. राजकीय शिक्षणातून लोकशाही विकेंद्रीकरण आणि विकास साधण्याचे कार्य या संस्था करीत असतात.

पंचायत राज्याची कल्पना आपल्या देशात खूपच पुरातन आहे. अगदी प्राचीन काळापासून पंचायत संस्था अस्तित्वात असल्याचे पुरावे, मनुस्मृती, महाभारत व कौटिल्याचे अर्थशास्त्र यामध्ये आहे. अर्थात त्या काळी पंचायती अनेक होत्या त्यांची कामेही वेगवेगळी होती.

ब्रिटिश भारतात येण्यापूर्वी ग्रामसभा अस्तित्वात होत्या. गावातील भांडणे, संपत्तीच्या वाटण्या, मंदिराची व्यवस्था आणि सामाजिक वाद या संदर्भात गावातील पंचमंडळी वरिष्ठ जात व वर्ग सहभागी होत होते.

स्वातंत्र्यानंतर प्रत्येक खेडयामध्ये स्वराज्य स्थापन झाले पाहिजे खेडी स्वयंपूर्ण बनली पाहिजेत व ग्रामीण भागातील सर्व लोकांना राजकीय प्रक्रियेमध्ये सहभागी होता आले पाहिजे यावर म. गांधीचा भार होता. त्यानुसार "गांधीच्या स्वप्नातील स्वराज्य" स्थापनेत भारतीय राज्यघटनेच्या ४० व्या कलमात तरतुद केली आहे.

खऱ्या अर्थाने पं. नेहरूंनी पंचायत संस्थाची स्थापना केली. स्थानिक नेतृत्वाचा उपयोग करून आर्थिक विकास करणेसाठी १९५६ मध्ये बलवंतराय मेहता समिती स्थापन केली. या समितीच्या अहवालानुसार

महाराष्ट्रात १ मे १९६२ साली महाराष्ट्र जिल्हा परिषद कायदा करुन पंचायत राज्याची स्थापना करण्यात आली. या त्रिस्तरीय योजनेचे मुल्यमापन करणेसाठी व तिच्यामध्ये सुधारणा घडवून आणणेसाठी अशोक मेहता व महाराष्ट्रात पी. बी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली समित्या नेमलेल्या होत्या.

१ मे १९६२ रोजी शिराळा पंचायत समितीची स्थापना झाली. सांगली जिल्ह्यातील पश्चिम टोकाचा व डोंगरी परंतु ऐतिहासिक दृष्टया प्रसिध्द असलेला हा तालुका आहे. प्रामुख्याने जंगल सत्याग्रहाची नांदी की ज्याला "बिळाशीचे बंड" म्हटले आहे, ते याच तालुक्यात घडून आलेले आहे. भारताच्या स्वातंत्र्य लढयात आणि आजच्या महाराष्ट्राच्या राजकारणात या तालुक्याचा फार मोठा सहभाग आहे. आणि त्या निमित्ताने शिराळा पंचायत समितीच्या कार्यपध्दतीचा आणि मुल्यमापनाचा आढावा घेण्याच्या दृष्टीने या लघुशोध निबंधामध्ये मी प्रयत्न करीत आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करीत असताना देशातील पंचायत राज्याचे पुनरुज्जीवन करण्यासंबंधी सध्या विचारमंथन होत आहे. ही आनंदाची गोष्ट आहे. आर्थिक दृष्टया कमकुवतपणा, राजकीय समाजीकरणाचे दुष्ट वर्तन आणि राजकीय अस्थिरता यामुळे पंचायत राज्य ख-या अर्थाने ग्रामीण जनतेपर्यंत जावून पोहचू शकलेले नाही. पंचायत राज्य हे घटकराज्य सरकारच्या हातचे बाहुले बनलेले आहे. आणि म्हणूनच पंचायत राज्य ख-या अर्थाने ग्रामविकासाचे महत्वाचे साधन बनू शकलेले नाही.

मा. पंतप्रधान राजीव गांधी यांनी पंचायत राज्य संकल्पनेला आर्थिक सामाजिक व राजकीय प्रशासकीय स्थिरता देण्याच्या उद्देशाने तसेच राजकीय प्रक्रियेत जनतेचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने १५ मे १९८९ रोजी लोकसभेत पंचायत राज्य संस्था विषयी ६४ वे घटना दुरुस्ती विधेयक मांडलेले आहे. "पॉवर टू पिपल्स" ही नवी घोषणा हे विधेयक मांडताना पंतप्रधानांनी दिली. त्या घोषणेचा परामर्श घेण्याचाही प्रयत्न मी या लघुशोध निबंधामध्ये केलेला आहे.

या अभ्यासाचे क्षेत्र फक्त शिराळा पंचायत समिती हेच आहे. मुख्यत: १९७७ ते १९८९ या बारा वर्षांच्या काळातील पंचायत समितीच्या कार्याचा अभ्यास करण्यात येणार आहे. अभ्यासासाठी वर्तमानपत्रे, - विशेषांक, पंचायत समितीच्या कार्यालयातील कागदपत्रे, स्मरणिका, - वार्षिक अहवाल, पंचायत समितीतील पुढा-यांच्या मुलाखती इ. साधनांचा वापर केलेला आहे.

या लघुशोध प्रबंधामध्ये पहिल्याच प्रकरणात भारतातील प्राचीन, मध्ययुगीन व ब्रिटीशकाळात पंचायत संस्थांचा उदय व अस्तित्व कशा प्रकारचे होते. त्याप्रमाणे स्वातंत्र्यानंतर पंचायत संस्थाचा विकास करणेसाठी नेमलेल्या विविध समित्यांचा अभ्यास आणि त्यांचे मुल्यमापन करणेसाठी नेमलेल्या समित्यांचा आढावा घेतलेला आहे. पंचायत राज्यांचा विकास करणेसाठी १५ मे १९८९ रोजी भारताचे पंतप्रधान राजीव गांधी यांनी "लोकांच्या हाती सत्ता" या घोषणेने मांडलेल्या ६४ व्या घटना-दुरुस्तीचा अभ्यास हे एक या शोध निबंधाचे वैशिष्ठ्य आहे.

दुस-या प्रकरणामध्ये सांगली जिल्ह्याची भौगोलिक रचना व त्यातील शिराळा तालुक्याचे स्थान स्पष्ट केलेले आहे. याच प्रकरणामध्ये

शिराळा पंचायत समितीची १९७७ ते १९८९ अखेर कार्य करणा-या कार्यकारिणीची रचना विशद केलेली आहे. त्याचप्रमाणे या पंचायत समितीने तालुक्याचा विकास साधणेसाठी ज्या समित्यांची स्थापना केलेली आहे त्या समितीची रचना व त्यांनी आखलेल्या योजनांचा आढावा घेतलेला आहे.

प्रकरण तीन मध्ये पंचायत समितीच्या नियंत्रणाखाली कार्य करणा-या सहा समितींच्या कार्यांचा सखोल अभ्यास केलेला आहे. या समित्यांपैकी शिक्षण, कृषी, आरोग्य, बांधकाम, व पशुसंवर्धन या विभागामार्फत पंचायत समितीने लक्षणिय कामगिरी पार पाडलेली आहे. त्याचप्रमाणे समाजकल्याण विभागामार्फत चालविलेल्या वसतीगृहांचा अभ्यास या प्रकरणात केलेला आहे. मात्र समाजकल्याण खात्यामार्फत चालविण्यात येणा-या बालवाडयांच्या बाबतीत फारशी प्रगती नसलेने थोडक्यात आढावा घेतलेला आहे.

शिराळा पंचायत समितीची रचना , कार्य व राजकारण यांचा पध्दतशीर आढावा घेतल्यानंतर चौथ्या प्रकरणामध्ये वरील सर्वच घटकांचे टिकात्मक परीक्षण केलेले आहे. या संपूर्ण अभ्यासासाठी प्रामुख्याने - ऐतिहासिक पध्दतीचा वापर केलेला आहे. अंतिम प्रकरणामध्ये संपूर्ण शोध निबंधाचा थोडक्यात सारांश घेतलेला आहे. त्यामध्ये हा शोध निबंध लिहीणेचा हेतू, त्याचे स्वरुप व तिस-या टप्प्यामध्ये त्याचे टिकात्मक मुल्यमापन केलेले आहे.